# या सापांपासून सावध रहा

GREEN WORKS TRUST
For a greener and sustainable future

साप म्हणजे मरण ही भावना आपल्या डोक्यात पक्की बसलेली आहे. परंतु प्रत्येक सापाच्या दंशामुळे माणूस मृत्युमुखी पडतोच असे नाही. काही मोजकेच साप असे आहेत ज्यांच्यापासून आपल्याला धोका असतो.

**चला तर अशा सापांची ओळख करून घेऊया.**




- चिडला असता फणा काढतो
- फण्याच्या मागे विशिष्ट खूण असते




- याला मण्यार सुद्धा म्हणतात
- पांढरे पट्टे असलेला काळा साप
- मानेकडच्या भागात पट्टे दिसत नाहीत
- पाठीवर षट्कोनी खवले असतात



## ५ विषारी साप




- कमी लांबीचा छोटासा साप
- डोक्यावर बाणाची खूण






- याला घोणस सुद्धा म्हणतात
- जाडजूड शरीरावर चॉकलेटी धब्बे
- चिडला असता कुकरच्या शिट्टी सारखा आवाज करतो




- त्रिकोणी डोके असलेला हिरव्या रंगाचा साप
- पोटाकडचा रंग पिवळा असतो

**छायाचित्र सौजन्य:**
अनुराग गुडिले (घोणस), विशाल वर्मा (कांडर), सर्वेश अभ्यंकर (बाकी सर्व साप)

**नाग पंचमीच्या निमित्ताने ग्रीन वर्क्स ट्रस्ट द्वारा जनहितार्थ प्रसारित.**

## साप आपल्या घराच्या आसपास दिसल्यावर काय करावे ?

१. सापाचे निरीक्षण करून वरील ५ पैकी आहे की नाही याची खात्री करावी.
२. सापाच्या जवळ जाऊ नये.
३. शक्य असल्यास लांब काठीच्या सहाय्याने सापाला घरापासून दूर करावे.
४. साप विषारी असल्याची खात्री पटल्यास सर्पमित्राला बोलावून घ्यावे.

## महत्वाचे

जर कोणत्याही व्यक्तीला सर्पदंश झालाच तर इतर कोणत्याही ठिकाणी न नेता लवकरात लवकर दवाखान्यात न्यावे. योग्य इलाज झाल्यास सर्पदंश झालेली व्यक्ती पूर्ण बरी होऊ शकते.